क्रियापदप्रकाश.

भाग पहिला.

धातूंचे भेद.

जो शब्द नाम किंवा विशेषण नसून ज्याला लिंग आणि वचन असतें, आणि जो नामावरील क्रिया व त्या क्रियेचा काळ दर्शवीत असतो त्या शब्दास **क्रियापद** असें ह्मणतात. जसें—सूर्य **उगवला.** फुलें **उमलतात.** पक्षी **गातात.** इत्यादि.

क्रियापदांतील मूळ शब्दास **धातु** असें ह्मणतात. जसें—**उगव, उमल, गा** इत्यादि.

धातु **सकर्मक** आणि **अकर्मक** असे मुख्य दोन प्रकारचे आहेत. ज्याला कर्म असतें तो धातु **सकर्मक.** जसें—रामा काम **करितो.** आणि ज्याला कर्म नसतें तो धातु **अकर्मक.** जसें—रामा **हसतो.** इ०.

सकर्मकांत **एककर्मक** आणि **द्विकर्मक** असे दोन भेद आहेत. ज्याला एक कर्म असतें तो **एककर्मक.** याला फक्त **सकर्मकच** ह्मणण्याची रूढि आहे. जसें—गाय गवत **खाते.** इ०. ज्याला दोन कर्मे असतात तो धातु **द्विकर्मक.** जसें—रामा कृष्णाला गोष्ट **सांगतो.** इत्यादि.

धातूला कांहीं प्रत्यय लागून किंवा कांहीं विकार होऊन **प्रयोजक, शक्य,** आणि **साधितसकर्मक** असे तीन प्रकारचे धातु होतात. त्यांस **साधितधातु** ह्मणावें.

(१) धातूला **वि** किंवा **चवि** इत्यादि प्रत्यय लागतात, आणि

त्यापासून, कर्ता हा दुसऱ्या कोणाकडून क्रिया करवितो, असा अर्थ होतो, त्या धातूस **प्रयोजक** धातु ह्मणावें. जसें–पंतोजी मुलांकडून अभ्यास **करवितो.** इ०

अकर्मक धातूला **प्रयोजक** प्रत्यय लागला असतां तो धातु **सकर्मक** होतो. जसें–आई मुलाला **निजविते.** इ०

प्रयोजक प्रत्यय पुढें लिहिल्याप्रमाणें—

(अ) कर, धर, पळ, बस इत्यादि कांहीं धातूंला **वि** किंवा **[...]व** हे प्रत्[य]य लागतात. जसें–**करवितो**, किंवा **करिवतो.** इ०

(ब) [...]ले, घे, खा, ने, इत्यादि कांहीं धातूंला **ववि** किंवा **विव** हे प्रत्यय [ला]गतात. जसें–**देववितो**, किंवा **देविवतो.** इ०

(२) धातू[...] कर्त्याच्या अंगीं [...] **व** किंवा **वव** हे प्रत्यय लागतात, आणि त्यापासून, धातूला **शक्य** घी क्रिया करण्याची शक्ति [आ]हे असा अर्थ होतो, त्या [...] ह्मणावें. जसें–मला काम **करवतें**, **चालवतें**, **जाववतें**, इ०

शक्य प्रत्यय पुढें लि[...]

(अ) *आवडगण शिवाय[...]प्रमाणें—

[...]री धातूला **वव** हे [...]न इतर अनेकाक्षरी धातूला **व** आ[...] एका[...]ादि. प्रत्यय लागतात. जसें–**करवतें. जाववतें.** इत्[...] धातूंन[...]

---

* कांहीं [...] **व** किंवा **वव** हे शक्यर्थक प्रत्यय लागत नाहींत. त्या धातूंच्या अर्थातच शक्ति वगैरे अर्थ गर्भित असतात. अशा धातूंचा एक वर्ग केला आहे त्यास **आवडगण** ह्मणावें. त्यांत आवड, रुच, पच, मान, स्मर, भास, उकड, मळमळ, करम, फाव, वाट, दिस, सांपड, मिळ, हो, पाहिजे, नको, हावें, लाग, ये, समज, [...]ळ, खप, आढळ, सोस इत्यादि धातु येतात. (विशेष विचार आमच्या **विभ[...]प्रकाशांत** पहा.)

(३) जळ, मर, पड, इत्यादि कांहीं अकर्मक धातूंच्या उपान्त्य अकाराचा **आकार** होतो; आणि फुट, तुट, सुट इत्यादि कांहीं अकर्मक धातूंच्या उपान्त्य उकाराचा **ओकार** होऊन **टकाराचा डकार** होतो. **फिट** इत्यादीचें **फेड** होतें आणि ते धातु सकर्मक होतात. त्यांस **साधित सकर्मक** म्हणावें. जसें—जाळणें, मारणें, पाडणें, फोडणें, तोडणें, सोडणें, इ०

पी आणि **पाह** या सकर्मक धातूंपासून **पाज** आणी **दाखीव** हे द्विकर्मक धातु झालेले आढळले आहेत*. यांना **साधितद्विकर्मक** धातु ह्मणावें. जसें—आई मुलाला दूध **पाजते.** तो त्याला वस्तु **दाखवितो.** इ.

कित्येक नामें, विशेषणें, आणि अव्ययें यांस कांहीं प्रत्यय लागून साधित धातु होतात. हे बहुतकरून अकर्मक असतात. जसें—माणूस यापासून **माणसाळणें**, आंखूड यापासून **आंखडणें**, गुरगुर यापासून **गुरगुरणें**, किंवा **गुरकावणें, पतकरणें, नाकारणें, स्वीकारणें, झिडकारणें** इ० यांस **अधातुसाधित** ह्मणावें.

गौण धातु आणि **सहाय** धातु म्हणून आणखी धातूंचे दोन वर्ग आहेत. त्यांविषयीं विचार पुढें केला आहे.

कर्ता आणि क्रियापद मिळून कांहीं धातु साधतात. जसें—उजेड होतो यापासून '**उजाडतें**', सांज झाली यापासून **सांजावलें.** इ०. यांस **अधातुसाधित** धातु ह्मणावें.

---

* साधित सकर्मक आणि साधित द्विकर्मक धातूपासून, कर्ता दुसऱ्याकडून क्रिया करवितो असा अर्थ उत्पन्न होतो, परंतु त्यांना प्रयोजक धातु ह्मणूं नये. कारण धातूला **वि** किंवा **ववि** इत्यादि प्रत्यय लागून तसा अर्थ असेल तरच प्रयोजक धातु ह्मणावें असें नियमांत सांगितलें आहे. **जाळवितो, मारवितो, पाडिवतो, फोडवितो, तोडिवतो, सोडवितो, पिववितो, पाहवितो,** इत्यादि रूपें मात्र **प्रयोजक** ह्मणावीं.

क्रियापदांचीं रूपें.

धातूला कांहीं प्रत्यय लागून मुख्य सात प्रकारचीं रूपें होतात.

पहिला प्रकार–**करितो, करितात, करवितो, करवतें,** इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा बहुतकरून वर्तमानकाळ दर्शवितात. ह्मणजे, *प्रयोगकालीं ती क्रिया चालू आहे असें दर्शवितात.

दुसरा प्रकार–**केला, केलें, करविलें, करवलें,** इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा भूतकाळ दर्शवितात. ह्मणजे प्रयोगकालाच्या पूर्वीं ती क्रिया घडली असें दर्शवितात.

तिसरा प्रकार–**करी, करीत, करवीत, करवें,** इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा भूतकाळ दर्शवीत असून त्या वेळीं ती क्रिया बराच वेळ चालू होती असें दर्शवितात.

चौथा प्रकार—**करीन, करील, करवितील, करवेल,** इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा भविष्यकाळ दर्शवितात. ह्मणजे प्रयोगकालाच्या मागून ती क्रिया घडणार असें दर्शवितात.

पांचवा प्रकार—**कर, करो, करूं ? करीव,** इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा भविष्यकाळ दर्शवीत असून वक्ता हा ती क्रिया करण्याविषयीं आज्ञा करीत आहे असें दर्शवितात, किंवा वक्ता हा ती क्रिया करण्याविषयीं परवानगी मागत आहे असें दर्शवितात.

सहावा प्रकार—**करावा, करावें, करवावा,** इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा भविष्यकाळ दर्शवीत असून वक्ता हा दुसऱ्यास ती क्रिया करण्याविषयीं प्रार्थना किंवा उपदेश वगैरे करीत आहे असें दर्शवितात.

---

* वक्ता ज्या वेळीं भाषण करीत असतो त्या कालास **प्रयोगकाल** असें ह्मटलें आहे.

सातवा *प्रकार— **करता, करती, करिवता, करवतें**, इत्यादि. हीं रूपें त्या क्रियेचा भूतकालीन अभाव दर्शवितात. हीं रूपें नेहमीं जोडी-जोडीनें येतात. त्यांपैकीं पहिल्या क्रियेचा अभाव दुसऱ्या क्रियेच्या अभावास कारण असतो. जसें—त्याच्यानें कामें **करवतीं**, तर मला पैसा **मिळता** याचा अर्थ—त्याच्या हातून कामें झालीं नाहींत त्यामुळें मला पैसा मिळाला †नाहीं.

या सात प्रकारच्या रूपांपैकीं प्रत्येक प्रकारच्या रूपांत, पुरुष, लिंग, आणि वचन दाखविणारीं आणखी कांहीं रूपें आहेत. पुरुष तीन आहेत.

---

* या सात प्रकारच्या रूपांस अनुक्रमें **वर्तमानकाळ, भूतकाळ, रीतिभूतकाळ, भविष्यकाळ, आज्ञार्थ, विध्यर्थ**, आणि **संकेतार्थ**, अशा संज्ञा पूर्वव्याकरणकारांनीं दिल्या आहेत, परंतु त्या अन्वर्थक नाहींत; कारण, एकेका प्रकारच्या रूपापासून अनेक काळ आणि अनेक अर्थ निरनिराळ्या ठिकाणीं जाणले जातात. ह्मणून हीं रूपें वर दाखविलेल्या संख्यानुक्रमावरून ओळखावीं. आणि ज्या वाक्यांत जो काळ आणि अर्थ तीं दर्शवीत असतील तो सांगावा. याविषयीं अधिक विचार पुढें संयुक्त क्रियापदांच्या काळाच्या प्रकरणांत केला आहे.

† पाऊस पडला तर पीक येईल. यांतील **पडला**, या रूपापासून भूतकाळाचा बोध होत नाहीं. तें रूप दुसऱ्याप्रकारचें आहे हें मात्र खरें आहे. यास कोणी **संकेतार्थ** चुकीनें ह्मणतात. त्यापासून क्रियेचा भूतकालीन अभाव दर्शविला जात नाहीं. एक क्रिया दुसरीस कारण आहे, इतकेंच. 'तूं जा ह्मणजे मी येईन,' या वाक्याची आणि 'पाऊस पडला तर पीक येईल' या वाक्याची स्थिति सारखी आहे. ह्मणून अशा ठिकाणीं संकेतार्थ ह्मणूं नये. "पाऊस **पडता** तर पीक **येतें**" हीं रूपें मात्र संकेतार्थी किंवा सातव्या प्रकारचीं ह्मणतां येतील.

प्रत्येक पुरुषांत लिंगें तीन आहेत, आणि प्रत्येक लिंगांत वचनें दोन आहेत. ह्मणून एका धातूचीं सातही प्रकारचीं प्रत्येक पुरुषी, प्रत्येक लिंगी आणि प्रत्येक वचनी मिळून एकंदर रूपें—१ धातु × ७ प्रकार × ३ पुरुष × ३ लिंगें × २ वचनें = १२६ व्हावीं. परंतु कांहीं रूपें एकसारखींच होतात. यासाठीं उदाहरणार्थ कांहीं धातूंचीं रूपें पुढें चालवून दाखविलीं आहेत.

शीक धातु. प्रथम पुरुष.

प्रकार	पुल्लिंग		स्त्रीलिंग		नपुंसकलिंग	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
१*	शिकतों	शिकतों	शिकत्यें	शिकतों	०+	०+
२	शिकलों	शिकलों	शिकल्यें	शिकलों	०	०
३	शिके	शिकूं	शिके	शिकूं	०	०
४	शिकेन	शिकूं	शिकेन	शिकूं	०	०
५	शिकूं ?	शिकूं ?	शिकूं ?	शिकूं ?	०	०
६	शिकावा	शिकावे	शिकावी	शिकाव्या	०	०
७	शिकतों	शिकतों	शिकत्यें	शिकतों	०	०

* प्रथमपुरुषी पहिल्या प्रकारच्या रूपापासून भविष्यकाळाचाही बोध होतो.

+ प्रथम आणि द्वितीयपुरुषी नपुंसकलिंगी क्रियापदांचीं रूपें इसापनीतींतल्या कुत्र्यामांजरांच्या कल्पित गोष्टींत वगैरे येण्याचा संभव आहे खरा, परंतु तशा ठिकाणीं देखील पुल्लिंगी रूपेंच योजितात.

शीक धातु–द्वितीय पुरुष.

प्रकार	पुल्लिंग		स्त्रीलिंग		नपुंसकलिंग	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
१	शिकतोस	शिकतां	शिकतेस	शिकतां	०	०
२*	शिकलास	शिकलां-त	शिकलीस	शिकलां-त	०	०
३	शिकस	शिकां	शिकस	शिकां	०	०
४	शिकशील	शिकाल	शिकशील	शिकाल	०	०
५	शीक	शिका	शीक	शिका	०	०
६	शिकावास	शिकावे-त	शिकावीस	शिकाव्या-त	०	०
७	शिकतास	शिकतां	शिकतीस	शिकतां	०	०

शीक धातु–तृतीय पुरुष.

१	शिकतो	शिकतात	शिकते-त्ये	शिकतात	शिकतें	शिकतात
२	शिकला	शिकले	शिकली	शिकल्या	शिकलें	शिकलीं
३	शिके	शिकत	शिके	शिकत	शिके	शिकत
४	शिकेल	शिकतील	शिकेल	शिकतील	शिकेल	शिकतील
५	शिको	शिकोत	शिको	शिकोत	शिको	शिकोत
६	शिकावा	शिकावे	शिकावी	शिकाव्या	शिकावें	शिकावीं
७	शिकता	शिकते	शिकती	शिकत्या	शिकतें	शिकतीं

* शीक धातूचा एक गण आहे. त्यांत शीक, पढ, समज, उमज, ह्मण, जेव, इत्यादि धातु आहेत. यांचीं दुसऱ्या प्रकारचीं रूपें वाक्यांत आलीं असतां-ही कर्तरि प्रयोग असतो. तसा इतर सकर्मक धातूच्या दुसऱ्या प्रकारच्या रूपाच्या वेळीं नसतो. कर्मणि असतो. ह्मणून **शीकगणांतील** धातूंला **भूत-**

कर धातु (भूतकर्मणि.) प्रथम पुरुष.

१	करितों	करितों	करित्यें	करितों	०	०
२	* ०	०	०	०	०	०
३	करी	करूं	करी	करूं	०	०
४	करीन	करूं	करीन	करूं	०	०
५	करूं ?	करूं ?	करूं ?	करूं ?	०	०
६	* ०	०	०	०	०	०
७	करितों	करितों	करित्यें	करितों	०	०

कर धातु–द्वितीय पुरुष.

१	करितोस	करितां	करितेस	करितां	०	०
२	०	०	०	०	०	०
३	करीस	करां	करीस	करां	०	०
४	करशील	कराल	करशील	कराल	०	०
५	कर	करा	कर	करा	०	०
६	०	०	०	०	०	०
७	करितास	करितां	करतीस	करितां	०	०

कर्तरि आणि इतर सकर्मक धातूंला **भूतकर्मणि** या नव्या संज्ञा आह्मीं योजिल्या आहेत. भूतकर्तरि धातूंचा कर्मणिप्रयोग होत नाहीं. ह्मण धातु हा अपवादक आहे. आंचव, अंतर, मूक, भूल, भी इत्यादि कांहीं धातु भूतकर्तरि होत.

* कर धातु हा भूतकर्मणि आहे. ह्मणून याचीं दुसऱ्या आणि सहाव्या प्रकारचीं रूपें असतांना कर्मणि किंवा भावि प्रयोग असतो. प्रथमपुरुषी आणि द्वितीयपुरुषी नामें कर्में असण्याचा संभव फारच कमी असतो. प्रथम आणि द्वितीय पुरुषी कर्में आलींच तर भाविप्रयोग होतो. भाविप्रयोगांत क्रियापद

कर धातु–तृतीय पुरुष.

१	करितो	करितात	करित्ये	करितात	करितें	करितात
२	केला	केले	केली	केल्या	केलें	केलीं
३	करी	करीत	करी	करीत	करी	करीत
४	करील	करतील	करील	करतील	करील	करतील
५	करो	करोत	करो	करोत	करो	करोत
६	करावा	करावे	करावी	कराव्या	करावें	करावीं
७	करता	करते	करती	करत्या	करतें	करतीं

(अकर्मक) अस धातु–प्रथम पुरुष.

१	आहे. होय	आहों. होत	आहे. होय	आहों. होत	०	०
२	होतों	होतों	होत्यें	होतों	०	०
	असलों	असलों	असलें	असलों		
३	असे	असूं	असे	असूं	०	०
४	असेन	असूं	असेन	असूं	०	०
५	असूं ?	असूं ?	असूं ?	असूं ?	०	०
६	असावा	असावे	असावी	असाव्या	०	०
७	असतों	असतों	असत्यें	असतों	०	०
८*	असतों	असतों	असत्यें	असतों	०	०

नेहमीं तृतीयपुरुषी एकवचनी नपुंसकलिंगी असतें. कर्मणिप्रयोगांत तृतीयपुरुषी सर्वलिंगी आणि सर्ववचनी कर्मे येतात. आणि त्याप्रमाणें क्रियापदाचें लिंग-वचन असतें ह्मणून या धातूचीं तृतीयपुरुषी मात्र दुसऱ्या आणि सहाव्या प्रकारचीं रूपें दाखविलीं आहेत.

* अस धातु आणि त्याचाच अकरणरूपी नस धातु यांचीं, असतो, असतात, असतें इत्यादि रूपें होतात. यांपासून त्या क्रियेच्या वर्तमानकाळाचा बोध

अस धातु–द्वितीय पुरुष.

१	आहेस	आहां-त	आहेस	आहां-त	०	०
२	होतास	होतां	होतीस	होतां	०	०
	असलास	असलां-त	असलीस	असलां-त		
३	असस	असां	असस	असां	०	०
४	असशील	असाल	असशील	असाल	०	०
५	अस	असा	अस	असा	०	०
६	असावास	असावे-त	असावीस	असाव्या-त	०	०
७	असतास	असतां	असतीस	असतां	०	०
८	असतोस	असतां	असतेस	असतां	०	०

अस धातु–तृतीय पुरुष.

१	आहे. होय	आहेत.होत	आहे. होय	आहेत.होत	आहे.होय	आहेत.होत
२	होता.	होते.	होती	होत्या	होतें	होतीं
	असला	असले	असली	असल्या	असलें	असलीं
३	असे	असत	असे	असत	असें	असत
४*	असेल	असतील	असेल	असतील	असेल	असतील
५	असो	असोत	असो	असोत	असो	असोत
६*	असावा	असावे	असावी	असाव्या	असावें	असावीं
७	असता	असते	असती	असत्या	असतें	असतीं
८	असतो	असतात	असते	असतात	असतें	असतात

होत असून रीतीचाही बोध होतो. अस आणि नस धातूंच्या या आठव्या प्रकारास **रीतिवर्तमान** काळ अशी संज्ञा आहे. या प्रकारचीं रूपें इतर कोणत्याही धातूचीं होत नाहींत.

* अस आणि नस धातूच्या चौथ्या प्रकारच्या रूपांपासून भविष्यकाळाचा

नस धातु–प्रथम पुरुष.

१	नाहीं.नव्हे	नाहीं.नहोत	नाहीं. नव्हे	नाहीं.नहोत	०	०
२	नव्हतों नसलों	नव्हतों नसलों	नव्हत्यें नसल्यें	नव्हतों नसलों	०	०
३	नसे	नसूं	नसे	नसूं	०	०
४	नसेन	नसूं	नसेन	नसूं	०	०
५	नसूं ?	नसूं ?	नसूं ?	नसूं ?	०	०
६	नसावा	नसावे-त	नसावी	नसाव्या-त	०	०
७	नसतों	नसतों	नसत्यें	नसतों	०	०
८	नसतों	नसतों	नसत्यें	नसतों	०	०

नस धातु–द्वितीय पुरुष.

१	नाहींस नव्हेस	नाहीं	नाहींस नव्हेस	नाहीं	०	०
२	नव्हतास नसलास	नव्हतां नसलां-त	नव्हतीस नसलीस	नव्हतां नसलां-त	०	०
३	नसस	नसां	नसस	नसां	०	०
४	नसशील	नसाल	नसशील	नसाल	०	०
५	नस	नसा	नस	नसा	०	०
६	नसावास	नसावे-त	नसावीस	नसाव्या-त	०	०
७	नसतास	नसतां	नसतीस	नसतां	०	०
८	नसतोस	नसतां	नसतीस	नसतां	०	०

बोध होतो किंवा संशयार्थाचाही बोध होतो. सहाव्या प्रकारच्या रूपांपासून संभव, तर्क, अनुमान, आणि संशय इत्यादि अनेक अर्थांचा बोध होतो. दुसऱ्या प्रकारच्या **असलों** इत्यादि रूपांपासून भविष्यकाळ, आणि संशय यांचा

नस धातु–तृतीय पुरुष.

१	नाहीं नव्हे	नाहींत नव्हेत	नाहीं नव्हे	नाहींत नव्हेत	नाहीं नव्हे	नाहींत नव्हेत
२	नव्हता नसला	नव्हते नसले	नव्हती नसली	नव्हत्या नसल्या	नव्हतें नसलें	नव्हतीं नसलीं
३	नसे	नसत	नसे	नसत	नसे	नसत
४	नसेल	नसतील	नसेल	नसतील	नसेल	नसतील
५	नसो	नसोत	नसो	नसोत	नसो	नसोत
६	नसावा	नसावे	नसावी	नसाव्या	नसावें	नसावीं
७	नसता	नसते	नसती	नसत्या	नसतें	नसतीं
८	नसतो	नसतात	नसत्ये	नसतात	नसतें	नसतात

***करिती, करिताती, जाती, बोलसी** इत्यादि रूपें कवितेंत मात्र आढळतात.

करणार, जाणार, येणार, बसणार इत्यादि रूपांस क्रियापद न ह्मणतां **अव्यय (धातुसाधित)** ह्मणावें हें सयुक्तिक दिसतें. कारण सर्वही पुरुषी सर्वही लिंगी आणि सर्वही वचनी **णार** हा एकसारखाच बोध होतो. तीं रूपें जोडीजोडीनें येतात. परंतु त्यांस संशयार्थ पाहिजे तर ह्मणावें. संकेतार्थ ह्मणूं नये. जोडीनें येतात ह्मणजे एकाच जातीचीं दोन रूपें जवळ जवळ येतात असें नाहीं. एक रूप दुसऱ्या रूपाकरितां सापेक्ष असतें. जसें–तो असला तर ती जाईल, ती असली ह्मणजे तो येतो. इ०. दुसऱ्या क्रियेला पहिली क्रिया कारण असते इतकें खास आहे.

* याशिवाय आणखी नानाप्रकारचीं रूपें कवितेंत आढळतात परंतु त्यांचा उल्लेख या लहानशा पुस्तकांत केला नाहीं. फक्त गद्यग्रंथांत येणाऱ्या रूपांचा विचार या पुस्तकांत केला आहे.

प्रत्यय लागतो. या अव्ययाच्या पुढील अस धातूचें क्रियापद बहुतकरून गुप्त असतें त्याचा अध्याहार करावा.

अस आणि **नस** यांशिवाय इतर धातूंचीं मागें सांगितल्याप्रमाणें सात सात प्रकारचीं रूपें होतात. परंतु कांहीं धातूंचीं रूपें फारच कमी होतात. अशा धातूंस **गौण** धातु ह्मणतात. ते धातु व त्यांचीं रूपें पुढें सांगितल्याप्रमाणें होतात. **गौण** धातु सर्वही **आवडगणांत** येतात.

पाहिजे या गौण धातूचीं रूपें–**पाहिजे, पाहिजेत. पाहिजेस, पाहिजेल.** इतकींच होतात.

नको या **गौण** धातूचीं रूपें—**नको, नका, नकोत, नकोस** इतकींच होतात.

हावें या **गौण** धातूचीं रूपें–**हावा, हावे, हावी, हाव्या, हावें, हावीं, हावास, हावेत, हावीस, हाव्यात, हावींत** इतकींच होतात.

पुरे* या **गौण** धातूचीं रूपें–**पुरे, पुरेत, पुरत** इतकींच होतात.

---

* पर्याप्ति होणें याच अर्थाचा दुसरा एक **पुर** धातु आहे, त्याचीं इतर धातूप्रमाणें रूपें होतात. परंतु पांचव्या प्रकारचीं होत नाहींत. **पुरें** हें विशेषण-ही आहे त्याच्या विशेष्याप्रमाणें त्याचीं रूपें बदलतात. जसें—**पुरें** काम, **पुरा** शहाणा **पुरी** ओळख. याचीं **पुरतें, पुरता, पुरती**; आणि **पुरेसा, पुरेशीं, पुरेसें** अशींही रूपें होतात. **नको** या धातूची गणना **सहाय** धातूंतही आहे. **नये** या धातूचीं रूपें फार कमी होतात, एवढ्यासाठीं त्यास **गौण** धातु ह्मणतां येईल; परंतु तो नेहमीं सहाय धातुच असतो. इतर गौण धातूप्रमाणें त्याचा स्वतंत्र प्रयोग कधीं होत नाहीं. धातुसाधितापुढें होतो. "करितां कामा **नये**" या उदाहरणांत देखील करितां हें धातुसाधित रूप आलेंच आहे.

नये या **गौण** धातूचीं रूपें-**नये, नयेत, नयेस.** इतकींच होतात. **नलगे** हें क्रियापद **न** आणि **लागे** या दोन शब्दांपासून उत्पन्न झालें आहे.

कित्येक धातूंचीं दुसऱ्या प्रकारचीं रूपें चमत्कारिक होतात. ते धातु व त्यांचीं रूपें पुढें लिहिल्याप्रमाणें. जसें–कर–**केलें**, मर–**मेलें**, सांग–**सांगितलें**, दे–**दिलें**, हो–**झालें**, जा–**गेलें**, घे–**घेतलें**, बघ–**बघितलें**, घाल–**घातलें**, म्हण–**म्हटलें**, ने–**नेलें**, ठेव–**ठेविलें**, खा–**खाल्लें**, पी–**प्यालें**, गा–**गाइलें**, ऊड–**उडालें** किंवा **उडलें**, ये–**आलें**, इत्यादि, इत्यादि.

क्रियापदप्रकाश.

भाग दुसरा.

संयुक्त क्रियापदें.

दोन अथवा अधिक शब्द मिळून जसा एक सामासिक शब्द होतो, त्याचप्रमाणें एक किंवा अधिक धातुसाधितें आणि एक क्रियापद मिळून एक **संयुक्त क्रियापद** होतें. धातूला प्रत्यय लागून जशीं क्रियापदें होतात, तसेच कांहीं प्रत्यय लागून धातुसाधित शब्द तयार होतात. त्यांपैकीं ज्यांच्या योगानें संयुक्त क्रियापदें होतात ते धातुसाधित शब्द आणि त्यांच्या पुढें येणारीं क्रियापदें पुढें सांगितलीं आहेत. संयुक्त क्रियापदांत धातुसाधितापुढें येणाऱ्या क्रियापदास **सहाय** क्रियापद ह्मणतात.

कर इत्यादि धातूंच्या **करीत, केलें, करणार, करूं, करितां, करून, करिता,** आणि **करावें,** या धातुसाधितांपुढें सहाय धातूचीं क्रियापदें येऊन संयुक्त क्रियापदें होतात. **अस, नस, जा, ये, दे, घे, कर, लाग, पाहिजे हो, पहा, शक, इच्छा, जाण, बस, टाक, सोड, ठेव** इत्यादि **सहाय** धातु आहेत.

कोणत्या धातुसाधितापुढें कोणते सहाय धातु येतात याविषयीं कांहीं नियम बांधिले आहेत, ते पुढें लिहिल्याप्रमाणें:—

१ **करीत, केलें,** आणि **करणार** यासारख्या सर्व धातूंच्या धातुसाधितांपुढें **अस** आणि **नस** या धातूंचीं सर्व प्रकारचीं रूपें येतात. जसें—**करीत आहे, जात नाहीं, बसला होता, बोलणार असेल इ०.**

करीत यासारख्या रूपास **वर्तमानकालवाचक** धातुसाधित अव्यय ह्मणतात.

केला, केली, केलें, यासारख्या धातुसाधितास **भूतकालवाचक** धातुसाधित विशेषण ह्मणतात. अकर्मक धातु आणि भूतकर्तरि धातु यापासून तें झालें असल्यास तें कर्तृगामि असतें, ह्मणजे कर्त्याचें लिंगवचन त्यास लागतें. आणि *__आवड__ गणांतील सकर्मक धातु आणि भूतकर्मणि धातु यांपासून तें झालें असल्यास कर्मगामि असतें. जसें—रामा **गेला** नाहीं, रामा ती गोष्ट **समजला** नाहीं, रामाला साखर **आवडली** नाहीं, रामानें कामें **केलीं** आहेत. इत्यादि.

करणार यासारख्या रूपास **भविष्यकालवाचक** धातुसाधित अव्यय ह्मणतात.

२ **करूं** यासारख्या सर्व धातूंच्या रूपांपुढें परवानगी देणें या अर्थाचा **दे** धातु, आरंभ किंवा मदत करणें या अर्थाचा **लाग** धातु, **इच्छ** धातु, इच्छार्थक **पहा** धातु, **जाण** धातु, **शक** धातु, **जा** धातु, **नको,** आणि **नये** धातु ह्यांचीं रूपें **नकोत** या रूपाशिवाय सर्व येतात.

(अपवाद) **इच्छ, पाह, जाण, शक, जा,** (परवानगी देणें या अर्थी) **दे** आणि गत्यर्थक सर्व धातु यांच्या **ऊं**प्रत्ययान्तापुढें त्याच धातूचें रूप येत नाहीं. जसें—देऊं देतो, इच्छूं इच्छितो, पाहूं पाहतो, जाणूं जाणतो, शकूं शकतो, जाऊं जातो, चालूं जातो इत्यादि प्रयोग होत नाहींत. नको आणि नये यांचीं धातुसाधित रूपेंच होत नाहींत.

---

* यांचा कर्ता द्वितीयान्त असतो. यांचा कर्तरिप्रयोग होत नाहीं. (आमचा **विभक्तिप्रकाश** पहा) **आठविणें** या धातूचें **आठवणें,** हे शक्य प्रत्ययान्त रूप आहे. ह्मणून **आठव** धातु **आवड**गणांत येत नाहीं.

३ फक्त **ऐकूं हसूं**, आणि **रडूं** या रूपांपुढें फक्त **ये** धातूचीं सर्वही एकवचनी रूपें येतात. जसें– **ऐकूं** येतें, **हसूं** आलें, **रडूं** येईल. इत्यादि.

४ फक्त **देऊं** या रूपापुढें फक्त **कर** धातूचीं सर्व रूपें येतात.

५ फक्त **लागूं** आणि **चालूं** या रूपांपुढें **कर** आणि **हो** धातूचीं सर्व रूपें येतात.

६ फक्त **जेऊं**, आणि **न्हाऊं**, या रूपांपुढें फक्त **घाल** धातूचीं सर्व रूपें येतात.

७ फक्त **मरूं** या रूपापुढें **घाल** धातूचीं दुसऱ्या प्रकारचीं रूपें ये०.

(अपवाद) तांदूळ **सडूं** घाल, **शिजूं** घाल असे प्रयोग क्वचित् आढळतात. **सुरू** या शब्दापुढें **कर** आणि **हो** धातूचीं रूपें येतात. परंतु **सुरू** हें धातुसाधित नसल्यामुळें **सुरू करणें, होणें**, हें संयुक्त क्रियापद ह्मणूं नये.

८ **करितां** यासारख्या सर्व धातुसाधित रूपांपुढें ती क्रिया करण्याची शक्ति किंवा ज्ञान आहे या अर्थी **ये** धातूचीं सर्व रूपें येतात. जसें–**गातां** येतें, **शिवतां** येईल. इत्यादि.

९ **करीत** आणि **केलें** यासारख्या सर्व धातुसाधितांपुढें **जा** या धातूचीं सर्व रूपें येतात. जसें–**देत** जा, **दिला** गेला, **जात** जा इ०.

*१० **केलें** यासारख्या सर्व धातुसाधितांपुढें **पाहिजे** या धातूचीं सर्व रूपें येतात. जसें–केलें पाहिजे, दिलीं पाहिजेत. इ०.

११ **करिता** यासारख्या सर्व धातुसाधित विशेषणांपुढें **हो** धातूचीं दुसऱ्या प्रकारचीं रूपें येतात. जसें–**करिता** झाला, **देती** झाली. इ०.

---

* **लें**, प्रत्ययान्त धातुसाधित विशेषण कर्तृगामि आणि कर्मगामि केव्हां असतें हें, नियम १ यांत सांगितलेंच आहे.

१२ फक्त **चालता** या रूपापुढें मात्र **हो** धातूचीं सर्व रूपें येतात. जसें–**चालता** हो. **चालता** होईल. **चालते** होतील, इ०

१३ **करावें** यासारख्या सर्व धातुसाधितांपुढें जरूरी असणें, किंवा भाग पडणें या अर्थीं **लाग** धातूचीं सर्व रूपें येतात. जसें **द्यावें** लागतें, **करावा** लागतो. **विकावी** लागेल. इ०

१४ **करीत** यासारख्या सर्वही रूपांपुढें **बस** आणि **चल** किंवा **चाल** धातूचीं सर्वही रूपें येतात. जसें–**देत** बसतो, **देत** चल. इ०.

१५ कित्येक धातूंच्या **ऊन**प्रत्ययान्त धातुसाधित अव्ययापुढें **जा, ये, अस, टाक, सोड, राह, दे, घे, पाड,** इत्यादि कांहीं धातूंचीं रूपें येतात.

आतां कोणत्या **ऊन** प्रत्ययान्तापुढें कोणते धातु येतात याविषयीं कांहीं नियम बांधिले आहेत ते पुढें सां० प्र०:—

१ **पळ, भर, दम, कुज, नास, सड, चीड, कीड, चढ, सर, पड, वाह, भूल, दीप, सुक, कोमेज, जळ, संप, भी, ऊड, मर, फाट, मोड,** इत्यादि कांहीं धातूंच्या **ऊन** प्रत्ययान्तापुढें **जा** धातूचीं सर्वही रूपें येतात. जसें–**पळून** जातो, **भरून** गेलें, **कुजून** जाईल. इ०

२ **भर, कळ, समज, उमज, चाल, दीस, बन, घड, जम, जूळ,** इत्यादि कांहीं धातूंच्या **ऊन** प्रत्ययान्तापुढें **ये** धातूचीं रूपें येतात. जसें–भरून आलें, समजून येईल. इ०.

३ **आवड** गणावांचून इतर सर्वही सकर्मक धातूंच्या **ऊन** प्रत्ययान्तापुढें **टाक, घे,** आणि **सोड,** या धातूंचीं सर्वही रूपें येतात. जसें–**करून** टाकतो, **करून** घेतो, **देऊन** टाकतो. इ०

४ **लाव पाठीव, सोड, झुगार, झोक, ठोक, सांग, हाक, हाकल, पिटीव, पिटाळ** इत्यादि कांहीं धातूंच्या **ऊन** प्रत्ययान्तापुढें **'दे'** धातूचीं सर्व रूपें येतात. जसें–**लावून** देतो, **पाठवून** देईल, **झुगारून** देतो, **सोडून** देतो, **हाकलून** देतो. इ०

५ **हाकून, हाकलून, पिटवून, पिटाळून** या रूपांपुढें **लाव** धातूचीं रूपें येतात. जसें–हाकून **लावतो,** पिटाळून **लावीन,** इत्यादि.

६ **बस, पड, जेव, खा, नीज, लाग, धर,** इत्यादि कांहीं धातूंच्या **ऊन** प्रत्ययान्तापुढें **अस** आणि **राह** धातूंचीं रूपें येतात. जसें–बसून **असतो,** पडून **राहतो,** खाऊन **असतो.** इ०

७ **हाणून** या रूपापुढें **पाड** धातु, आणि **ओढून** या रूपापुढें **आण** धातूचीं रूपें येतात. जसें–हाणून **पाडतो.** ओढून **आणतो.** इ०

बोलावूं जातो, बोलावूं पाठवितो, बोलावूं धाडतो, (निरोप) **सांगून पाठवितो—धाडतो,** (मुलीला) **पाहूं आलें,** (मुली) **सांगून आल्या,** (रामानें कृष्णाला) **हसूं आणिलें, रडूं आणिलें,** इत्यादि उदाहरणें संयुक्त क्रियापदाचींच होत. **हसूं आणिलें** आणि **रडूं आणिलें,** यांचा अर्थ हसविलें आणि रडविलें हा होय. **करावयाचें आहे, पाहिजे आहे, नको होतें, पुरे आहे, नको आहे, हवें आहे,** इत्यादि क्रियापदें **संयुक्त**च जाणावीं. **करावयाचें** या धातुसाधित विशेषणापुढें पहिल्या प्रकारचें क्रियापद आलें असतां **भविष्य**काळ जाणला जातो. आणि दुसऱ्या प्रकारचें रूप आलें असतां त्या क्रियेचा भूतकालीन अभाव दर्शविला जातो. जसें–करावयाचें आहे. ह्मणजे अद्यापि ती क्रिया घडली नसून पुढें घडणार

असा अर्थ होतो. आणि करावयाचें होतें—ह्मणजे ती क्रिया घडली नाहीं असा अर्थ होतो.

संयुक्त क्रियापद ओळखण्याचा साधारण नियम असा आहे कीं, धातुसाधित आणि त्याच्या पुढील क्रियापद मिळून एक निराळा अर्थ असतो. सहाय क्रियापदाचा अर्थ रूढ नसतो. ह्मणजे सहाय क्रियापद जेव्हां एकटें असतें, तेव्हां जो त्याचा अर्थ असतो तो नसतो. संयोगजन्य असा त्या दोन्ही शब्दांचा मिळून अर्थ असतो. त्याला पाहिजे तर लाक्षणिक अर्थ ह्मणावें. आणखी एक अशी खूण आहे कीं, संयुक्त क्रियापदांतील दोन शब्दांमध्यें इतर शब्दांचें व्यवधान येऊं शकत नाहीं. जसें—'काशीस **चालत जा**' आणि 'दररोज चार कोस **चालत जा**' यांपैकीं पहिले वाक्यांतील क्रियापद संयुक्त नाहीं. दुसरे वाक्यांतील संयुक्त आहे. पहिले वाक्यांतील शब्द '**चालत** काशीस **जा**' असे फिरविले तरी अर्थबदल होत नाहीं. ह्मणजे धातुसाधित आणि पुढील क्रियापद यांमध्यें व्यवधान येऊं शकतें. तसें दुसऱ्या वाक्याचे वेळीं करितां येत नाहीं. **विकत घेतो, विकत देतो,** हीं संयुक्त क्रियापदें नव्हेत. कारण विकत हें **वीक** धातूचें **करीत, जात, येत** यासारखें धातुसाधित रूप नव्हे. **विकीत** हें रूप मात्र **करीत** यासारखें आहे म्हणून '**विकीत आहे**' हें संयुक्त क्रियापद ह्मणावें. शिवाय **घे** आणि **दे** या धातूंचे रूढार्थच येथें होतात. ह्मणून अशा ठिकाणीं संयुक्त क्रियापद न मानितां **विकत** हें क्रियाविशेषण अव्यय मानावें.

क्रियापदांच्या कालदर्शक संज्ञा.

क्रियापदांच्या सात प्रकारच्या रूपांस जशा **वर्तमान, भूत, भविष्य,** इत्यादि संज्ञा इतर व्याकरणकारांनीं केल्या आहेत, तशा संयुक्त क्रियापदांचीं जितकीं रूपें होतात तितक्या संज्ञा त्यांनीं केल्या नाहींत. संयुक्त क्रियापदांत येणाऱ्या **आहे, आहेत, होता,** वगैरे रूपांपासून त्या त्या एकट्या येणाऱ्या रूपापासून होणाऱ्या काळांत व अर्थांत फरक पडत नाहीं असें नाहीं. काळांत व अर्थांत फरक पडतो असें आहे तर त्यांच्या संज्ञाही निराळ्या करावयास पाहिजे होत्या. बरें, **वर्तमानभूत, भूतवर्तमान, भविष्यवर्तमान, अपूर्णवर्तमान, पूर्णभूत, अपूर्णभूत, भूतभूत** वगैरे कांहीं केल्या आहेत त्यांत कित्येक फारच असंबद्ध आहेत. ज्या कमी आहेत त्या आतां करितां येणार नाहींत असें नाहीं. परंतु अन्वर्थक मात्र करितां येणार नाहींत. यासाठीं मुळीं त्या संज्ञा करण्याचें कारणच नाहीं किंवा करून उपयोगही नाहीं. कारण एकेका रूपापासून जर अनेक अर्थांचें ज्ञान होतें तर त्यांपैकीं एखादा अर्थ घेऊन तद्वाचकशब्दघटित संज्ञा त्या रूपास द्यावी, तर ती अन्वर्थक संज्ञा कशी होईल? कधीं होणार नाहीं. यासाठीं तीं तीं रूपें त्यांच्या संख्यानुक्रमावरून ओळखीत जावीं आणि ज्या ठिकाणीं जो काळ किंवा अर्थ संभवत असेल तो सांगत जावा असें आमचें मत आहे. यापासून विद्यार्थ्यांसही एक प्रकारानें लक्षांत ठेवण्यास सोपें होईल आणि व्याकरणाच्या नियमांसही एक प्रकारचा व्यवस्थितपणा येईल. नामाच्या रूपास जशा **प्रथमा, द्वितीया,** इत्यादि क्रमवाचक संज्ञा केल्या आहेत; **कर्तृविभक्ति,** किंवा **कर्मविभक्ति,** अशा केल्या नाहींत; याचें कारण एका रूपापासून अनेक अर्थांचें ज्ञान

होतें ह्मणून त्यापैकीं एका अर्थाची वाचक संज्ञा केली असती तर ती खरोखरच अन्वर्थक झाली नसती. त्याचप्रमाणें क्रियापदांच्याही संज्ञा त्यांच्या रूपावरून **पहिलें, दुसरें, तिसरें,** अशा क्रमवाचक संज्ञा प्रथमच करावयास पाहिजे होत्या, त्या न केल्यामुळें त्यांच्या व्याकरणांत या संबंधानें फार घोटाळा झाला आहे. तो घोटाळा या पुस्तकांतून अजीबाद काढून टाकिला आहे. संस्कृत व्याकरणांत क्रियापदांच्या रूपांस **लट्, लिट्, लुट्,** अशा संज्ञा आहेत. भूतकाळी क्रियापद, वर्तमानकाळीं रूप असें ह्मणत नाहींत.

करणरूप व अकरणरूप.

अस धातूच्या *अर्थाचा अभाव दर्शविणारें जसें **नस** हें धातुरूप आहे तसें इतर धात्वर्थाचा अभाव दर्शविणारें निराळें धातुरूप नसतें. ह्मणून त्या त्या क्रियेचा अभाव दर्शविणें असतांना कांहीं ठिकाणीं त्या धातूचें धातुसाधितरूप होऊन त्याच्यापुढें **नस** याचीं रूपें येतात. कांहीं ठिकाणीं मूळचें रूप कायम राहून **न** हें अव्यय येतें. आणि कांहीं ठिकाणीं धातुसाधितरूप न होतां मूळचें क्रियापदरूप कायम राहून त्याच्या पुढें **नस** याचीं रूपें येतात. तेव्हां सर्वच ठिकाणीं **अकरणरूप** ह्मणणें बरोबर नाहीं. ज्या ठिकाणीं मूळच्या क्रियापदरूपास विकार झाला असेल आणि त्याच्यापुढें **नस** याचें रूप आलें असेल तेथें मात्र त्या क्रियापदाचें **अकरणरूप** ह्मणावें. बाकीचे ठिकाणीं **करणरूपच** ह्मणावें. असें माझें मत आहे. उदाहरण—**करितो,** याचें **करीत नाहीं** हें **अकरणरूप.** आणि **केलें** याचें **केलें नाहीं** हें **अकरणरूप** नव्हे. दोन्ही करणरूपेंच होत. तो **जाता**

---

* धातूपासून ज्या क्रियेचें ज्ञान होतें ती क्रिया त्या धातूचा **अर्थ** होय.

तर ती **जाती,** याचें तो **न जाता** तर ती **न जाती** हें अकरणरूप नव्हे. दोन्ही करणरूपेंच होत. याचें कारण असें आहे कीं, फक्त क्रियेचा अभाव दर्शविणाऱ्या क्रियापदास अकरणरूप ह्मणावें तर **न केलें, न गेला, न करितो,** हीं सुद्धां अकरणरूपेंच म्हणण्याचा प्रसंग येईल. इतकेंच नव्हे तर **आला** याचें **गेला** हें सुद्धां अकरणरूप ह्मणावें लागेल. तो **जाता,** ती **जेवती** या वाक्यांपासून क्रियेचा अभाव दर्शविला जातो ह्मणून तो न **जाता** तर ती न **जेवती** याचें अकरणरूप पहिलें वाक्य होऊं लागेल. फार काय? पण प्रत्येक धातु तदितर धातूचें अकरणरूप होऊं लागेल. यासाठीं मूळ क्रियापदास विकार होऊन त्याच्यापुढें **नस** याचीं रूपें येतात, त्यास मात्र **अकरण**रूप ह्मणावें, हेंच सयुक्तिक दिसतें. आणखी एक सांगण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, **नस** हा निराळा धातु आहे असें शास्त्रीयरीत्या ह्मणतां येत नाहीं. तो **अस** धातूचें अकरणरूपच आहे असें मानलें पाहिजे. निराळा धातु मानला तर पुनः **आला** याचें **गेला** हें अकरणरूप होऊं लागेल, किंवा प्रत्येक धातु प्रत्येकाचें अकरणरूप होऊं लागेल. मागें जीं **नस** धातूचीं निराळीं रूपें चालवून दाखविलीं आहेत तीं फक्त त्याचीं रूपें कशीं होतात हें दाखविण्यासाठीं होय. सिद्धान्तीं **अस** धातु मात्र खरा आणि **नस** हें त्याचें अकरणरूप हेंच खरें आहे.

क्रियेचा अभाव दर्शविणें असतां क्रियापदाचीं अकरणरूपें केव्हां व कशीं होतात तीं पुढें दाखविलीं आहेत.

संख्यानुक्र०	क्रियापदरूपें.	अभावदर्शकरूपें.
१	करितों, करित्यें, करितो, करितें, करित्ये, करितां.	करीत नाहीं ९
”	करितोस, करितेस,	करीत नाहींस ९
”	करितात.	करीत नाहींत ९
२	शिकलों,	शिकलों नाहीं * १७
”	शिकलास, शिकलीस,	शिकला नाहींस, शिकली नाहींस १७
”	शिकलांत	शिकलां नाहींत १७
”	शिकला, ली, लें	शिकला, ली, लें नाहीं * १७
३	शिके	शिकत नसे ११
”	शिकस	शिकत नसस ११
”	शिकूं	शिकत नसूं ११
”	शिकत	शिकत नसत * ११
४	शिकेन, शिकेल, शिकाल, शिकूं	शिकणार नाहीं २५
”	शिकतील	शिकणार नाहींत २५
”	शिकशील	शिकणार नाहींस ५५
५	शिको	न शिको * ५
”	शिकोस	न शिकोस * ५
”	शीक	शिकूं-नकोस ३३
”	शिकूं (प्रश्नार्थी)	शिकूं नको (प्रश्नार्थी)* ३३
६	शिकावा, वी, वें; वे, व्या, वीं,	न शिकावा, वी, वें; वे, व्या, वीं* ६

* ज्या रूपापुढें * अशी खूण आहे तें करणरूपच मानावें.